## ＊ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ＊

**(फक्त सभासदांकरिता)**

दि गव्हर्नमेंट सर्व्हन्टस् महाराष्ट्र को ऑप. क्रेडिट सोसायटी लि. पुणे ३०. या संस्थेची ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २९ मे २०२२ रोजी सकाळी १० वाजता केसकर सभागृह, नुमवि प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, २१ बुधवार पेठ, बाजीराव रोड, पुणे ४११००२ येथे खालील विषयांवर विचार करणे व मंजूरी देणेसाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय :

१) सभेचे मा.अध्यक्ष यांची निवड करणे.

२) रविवार दि. ३१ मे २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

३) सन २०२१-२०२२ सालचे तेरीज पत्रक, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, मंजूर करणे व नफ्याच्या वाटणीस मान्यता देणे.

४) सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास व सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पास मान्यता देणे.

५) सन २०२१-२०२२ च्या सरकारी (वैधानिक) व अंतर्गत लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करणे व नोंद घेणे.

६) सन २०२२-२०२३ च्या वैधानिक व अंतर्गत हिशोब तपासणीस यांची निवड करणे व मानधन ठरविणेबाबत.

७) पोटनियम दुरुस्तीबाबत.

८) कार्यालयीन फर्निचर बनविणेबाबत.

९) संचालक मंडळाच्या कर्जाबाबत माहीती घेणे.

१०) मा. सभासदांकडून आलेल्या सूचना व ठरावावर चर्चा करणे व निर्णय घेणे.

११) ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांचे परवानगीने चर्चा करणे.

**मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून**

**स्थळ : पुणे**

**मा.दत्तात्रय सबाजी कानडे**

**दिनांक : १० मे २०२२**

**सचिव**

### विशेष सुचना :

१) नोटीसची सही शिक्क्याची प्रत नोटीस बोर्डावर लावलेली असून स्थळप्रत दप्तरी दाखल आहे.

२) वरील सभा गणपुर्ती अभावी तहकूब करावी लागल्यास त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

३) ज्या सभासदांना अहवालासंबंधी काही माहीती व काही सूचना करावयाच्या असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयामध्ये रविवार दि. २२ मे २०२२ रोजी सकाळी ठिक १२ वाजेपर्यंत आणून द्याव्यात.

४) वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये होणाऱ्या कामकाजाबाबत नोटीशीमध्ये निर्देशिलेल्या बाबीसंबंधी कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.

५) वार्षिक सभेस उपस्थित राहातेवेळी सभासदांनी आपले ओळखपत्र व सभासद नंबर आणणे आवश्यक आहे.

६) सभासदांचा २०२२ पर्यंतचा लाभांश सभासदांच्या बँक खाती जमा करण्यात येईल. तरी ज्या सभासदांनी बँकेचे खाते नंबर संस्थेत सादर केले नसतील अशा सभासदांनी केवायसी फॉर्मसह आपल्या बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत के.वाय.सी. फॉर्मसह भरून संस्थेच्या कार्यालयात त्वरीत सादर करावी व त्यानंतरच आपला लाभांश बँक खाती जमा केला जाईल.